315

क्र : बीएमआरडीए/एमटीजी/३२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

दिनांक : १७ फेब्रुवारी, १९८४.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, १९८४ रोजी झालेल्या बत्तिसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत कांही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

ससार

सचिव
कार्यकारी समिती

प्रति :

सर्व सदस्य,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी.

-------

No.BMRDA/MTG/32.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th floor, Bandra(East),
B O M B A Y - 400 051.

Date : 17th February, 1984.

The minutes of the 32nd Meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 9th February, 1984 are enclosed.

Members are requested **kindly to intimate** their objections, if any.

SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To:
All Members.
The Officers of the B.M.R.D.A.

LP:840217:

(३१८)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
बत्तिसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ९ फेब्रुवारी १९८४ (गुरुवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता.

सभास्थान : माननीय उप मुख्यमंत्री यांचा
समिती-कक्ष, सहावा मजला, मंत्रालय

उपस्थित सदस्य :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. रामराव वा. आदिक<br>मा. उप मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री | -- | अध्यक्ष |
| २) | श्री. चंद्रकांत त्रिपाठी<br>नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| ३) | श्री. मनमोहनसिंग बेदी<br>मुंबईचे महापौर | -- | सदस्य |
| ४) | डॉ. सौरभ मजमुदार<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| ५) | श्री. न. रा. रंगनाथन्<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | -- | सदस्य |
| ६) | श्री. ल. चं. गुप्ता<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | -- | सदस्य |
| ७) | श्री. अ. ना. बटब्याल<br>महानगर आयुक्त,<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | -- | सदस्य-सचिव |

बाब क्र. १ : मागील (३१व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

सदर कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : मागील (३१व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

वरील बैठकीच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली. तथापि कार्यवाहीविषयक अहवालातील बाब क्र. ५ कडे महानगर आयुक्तांनी सदस्यांचे लक्ष वेधले आणि सांगितले की, प्रस्तुत बाबीवरील टिप्पणीत काहीही असले तरी बॅक-बे सौंदर्यीकरण योजनेवर आधारित जी दोन संकल्पचित्रे प्राप्त झाली आहेत त्यांवर सदस्यांना मतप्रकटन करता यावे या दृष्टीने विकासकाकडून प्राप्त झालेले दोन्ही देकार प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावेत अशी अध्यक्ष महोदयांची इच्छा आहे. त्यानंतर सदस्यांनी, मेसर्स प्रोमिनाड पार्क या विकासकाकडून प्राप्त झालेल्या संकल्पचित्रास मान्यता

...२/-

दिली व ज्या जमिनीवर ही सौंदर्यीकरण योजना साकार होणार आहे तिचा ताबा राज्य शासनाकडून (महसूल व वन विभाग) या प्राधिकरणाकडे आल्यानंतरच या सौंदर्यीकरण योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही केली जावी असाही आदेश दिला. तसेच वर उल्लेखित जमिनीचा, एक उद्यान विकसित करण्यासाठी म्हणून वापर होणार असल्याने त्या जमिनीचे प्राधिकरणास नाममात्र अधिमूल्य आकारण्यात यावे अशी विनंती महानगर आयुक्तानी नगर विकास विभागामार्फत राज्य शासनाच्या महसूल व वन विभागास करावी असाही आदेश प्राधिकरणाने दिला.

बाब क्र.३ : १९८४-८५ सालाचा वार्षिक कार्य-कार्यक्रम

वरील बाबीवरील चर्चेनंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.२४० :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की.(अ) या टिप्पणीसह सादर केलेला १९८४-८५ सालचा वार्षिक कामांचा कार्यक्रम संमत करण्यात येत आहे; आणि

(ब) वार्षिक कार्य-कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशीलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.४ : १९८४-८५ सालाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज

वरील बाबीवरील चर्चेनंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२४१ :

"असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, वित्तीय वर्ष १९८४-८५ सालचा अर्थसंकल्प आणि १९८३-८४ सालचे सुधारित अंदाज यातील महानगर प्राधिकरणाच्या जमा आणि संवितरित रकमा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम २३(१) खाली मंजूर करण्यांत येत आहेत.

" शिवाय असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे कार्यकारी समितीला योजना सर्वेक्षणे इ. कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी अंदाजे रु.१० लाखांपेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजुरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणांचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर प्रदान करीत आहे."

बाब क्र.५ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कर्मचाऱ्याच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला ठाणे तालुक्यातील पांचपाखाडी येथील जमिनीचे नियत वाटप

प्रस्तुत बाब टिप्पणीवर झालेल्या चर्चेनंतर प्राधिकरणाने प्रस्तावास तत्वतः

मंजुरी दिली. परंतु त्याचबरोबर संकल्पित सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे जमिनीचे हस्तांतरण होण्यापूर्वी त्या जमिनीचे निर्धारित अधिमूल्य आणि ज्या आधारे ते आकारण्यात आले तो आधार हे मुद्दे मान्यतेसाठी प्राधिकरणाला सादर केले जावेत असाही आदेश प्राधिकरणाने दिला. या बाबतच्या मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमिन विक्री) अधिनियमातील तरतुदीही जाणून घेण्याची इच्छा प्राधिकरणाने व्यक्त केली.

बाब क्र.६ : वांद्रे-कुर्ला समुहाच्या 'ई' ब्लॉकमधील क्र.सी-२३ ते सी-२५ या वाणिज्य भू खंडांची विक्री आणि अधिमूल्य निर्धारण

प्राधिकरणाने प्रस्तुत बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला व प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला आकारलेला रु.२८००/- हा दर वाजवी अधिमूल्य असल्याशी सहमती दर्शविली. परंतु सदर भरपाई दराच्या आधारे शासकीय संघटना वा शासनवत् संघटनांकडून भू-विक्रीसाठी देकार मागविण्याशी असहमत व्यक्त केले. प्राधिकरणाच्या कागदोपत्री उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित वेगवेगळया संघटनांची जमिनीची गरज जरी बैठकीत पटलावर ठेवण्यात आलेली असली तरी ज्या संघटनाना ते भू-खंड प्राधिकरण नियत वाटपाने देऊ इच्छिते. त्या संघटनांबाबत विशिष्ट अशी कोणतीही शिफारस बाब टिप्पणीत आढळली नाही. बाब टिप्पणीच्या परिच्छेद ६ मध्ये उल्लेखित निकषाशी प्राधिकरणाने सहमत व्यक्त केले. अर्जदार संघटनांमधील ज्या संघटना निकषपूर्तीस पात्र ठरतात अशा कोणत्या संघटनाना संदर्भीय भू-खंडांचे नियत वाटप केले जाईल यासंबंधी माहिती देणारा एक प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत ठेवण्यात यावा असेही बैठकीत सांगण्यात आले.

बाब क्र.७ : अधिसूचित कल्याण समूह क्षेत्राची प्रारुप संरचना विकास योजना ( लांबणीवर टाकण्यात आलेली बाब)

सदर बाब-टिप्पणीवर प्राधिकरणाने विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२४२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, अधिसूचित कल्याण समूह क्षेत्राच्या प्रारुप संरचना विकास योजनेस (१९८१-2001) हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्रस्तुत प्रारुप संरचना विकास योजनेचे प्रसिध्दीकरण करुन जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी आणि त्या प्रारुप विकास योजनेस अंतिम मान्यता देण्यात आवश्यक वाटणारी कोणतीही कृती करण्यासाठी शासनाने, महाराष्ट्र राज्य प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २० च्या पोटकलम (२) खाली आपल्या

....४/-

प्रदत्त शक्तींचा वापर करुन सदर विकास योजना प्रकाशित करावी, ही या प्राधिकरणाची शिफारस राज्य शासनाला कळविण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.८ : डोंबिवलीसाठी विकास योजना- उद्देशपर घोषणा करण्याबाबत</u>

प्राधिकरणाने वरील बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.२४३ :</u>

"ज्याअर्थी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ खाली स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० चे उपकलम १(क) च्या तरतुदीखाली कल्याण समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी एक विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून दिनांक १५ मार्च १९७६ च्या शासन अधिसूचना क्र.टीपीबी/१२७५/११९९/युडी-५ अन्वये एक विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली;

आणि ज्या अर्थी वर निर्दिष्ट कल्याण समूह म्हणून यापूर्वीच अधिसूचित करण्यात आलेल्या क्षेत्रातून काही क्षेत्र दिनांक १४ मार्च १९८३ ची शासन अधिसूचना क्र.टीपीएस/१२७८/६५११-युडी-५ अन्वये वगळणे तसेच ठाणे शहरातील महानगर-पालिका स्थापन झाल्याने अधिसूचित क्षेत्राच्या सीमेत तदनुरुप फेरफार करणेही शासनाला (नगर विकास विभाग) इष्ट वाटले.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, प्रकरण ६ मधील कलम ११३(८) खाली विशेष नियोजन प्राधिकरणाच्या समग्र क्षेत्रासाठी एक विकास योजना तयार करणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उक्त अधिनियमाच्या कलम ४०, उप-कलम (३) अन्वये वरील क्षेत्रासाठीचे विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने प्रयोज्य असल्याप्रमाणे आवश्यक वाटते.

आणि ज्या अर्थी, समग्र अधिसूचित क्षेत्राची प्रारुप विकास योजना तयार होईतोवर, अधिसूचित क्षेत्राच्या डोंबिवली या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागासाठी आणि त्या भोवतालच्या भागासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३२ खाली एक अंतरिम विकास योजना तयार करणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आवश्यक वाटते;

(१) आता त्या अर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ खाली प्रदत्त शक्तिंचा वापर करुन उक्त अधिनियमाच्या कलम २३ खाली एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने स्वतः च्या अधिकारितेखाली समग्र क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याची उद्देशपर घोषणा करीत आहे.

...५/-

(२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३२ खाली आपल्या अधिकारितेखालील समग्र क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना तयार केली जाई-तोवर अधिसूचित क्षेत्राच्या डोंबिवली या नावाने ओळखल्या जाणा-या आणि त्या भोवतालच्या भागासाठी एक अंतरिम योजना तयार करण्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण याव्दारे निर्णय घेत आहे.

या ठरावास जोडलेल्या अधिसूचित क्षेत्राचा-- ज्यासाठी विकास योजना तयार करावयाची आहे आणि ज्याचा नकाशा समग्र अधिसूचित क्षेत्राचे सीमा क्षेत्र तसेच त्याचा डोंबिवली या नावाने ओळखला जाणारा भाग व त्या भोवतालचा भाग दर्शवितो, आणि ज्या डोंबिवली आणि भोवतालच्या भागासाठी अंतरिम विकास योजना तयार करावयाची आहे त्याचा -- नकाशा जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात यावा.

विकास योजना तयार करण्याच्या अनुलक्षाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम आणि त्या अधिनियमाचे नियम या खाली आवश्यक असल्याप्रमाणे विकास योजना तयार करण्यासंबंधी उद्देशपर घोषणा प्रसिध्द करण्यास याव्दारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

विकास योजना तयार करण्याच्या कामासाठी आवश्यक असलेली कर्मचारी वर्गाची पदे मंजूर करण्यासही याव्दारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.९ :</u> मुंबई महानगर प्रदेशाच्या विस्तारित् (पेण-अलिबाग) क्षेत्रासाठी प्रारुप प्रादेशिक विकास योजना--प्रादेशिक नगर नियोजन समितीची नियुक्ती

वरील विषयाच्या बाब टिप्पणीत व्यक्त करण्यात आलेली मते विचारात घेऊन आणि नगर रचना समितीच्या रचनेत उचित बदल करता यावा म्हणून प्राधिकरणाने दिनांक ४ मार्च १९८३ रोजी ठराव क्र.२१३ अन्वये स्वीकृत केलेल्या आपल्या ठरावात अंशतः फेरफार करण्यास मान्यता दर्शविली व त्या अनुरोधाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.२४४ :</u>

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, या प्राधिकरणाने दिनांक ४ मार्च १९८३ रोजी संमत केलेल्या ठराव क्र.२१३ च्या शेवटच्या परिच्छेदात पुढीलप्रमाणे बदल करण्यांत यावा :

'त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण पुढील सदस्यांचा समावेश असलेली प्रादेशिक नगर रचना समिती नियुक्ती करीत आहे :

...६/-

१) व्यवस्थापकीय संचालक, सिडको,

२) महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण आणि

३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
(उक्त अधिनियमाचे कलम १०(३) खाली नगर रचना अधिकारी म्हणून)".

बाब क्र.१० : (अ) कल्याण समूह अधिसूचित क्षेत्र आणि
(ब) वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्र यांसाठी असलेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने तयार केलेले संबंधित अधिसूचित क्षेत्रांचे १९८२-८३ सालाचे वार्षिक अहवाल.

वरील बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२४५ :

"असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्यप्रमाणे आणि (अ) कल्याण समूहाचे अधिसूचित क्षेत्र आणि (ब) वांद्रे-कुर्ला समूहाचे अधिसूचित क्षेत्र यांसाठी नियुक्त झालेली एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर क्षेत्रासाठी तयार केलेला १९८२-८३ सालाचा वार्षिक अहवाल हे प्राधिकरण मंजूर करीत आहे तसेच तो अहवाल राज्य शासनाला सादर करण्यासाठी महानगर आयुक्तांना या ठरावान्वये प्राधिकृत करण्यांत येत आहे."

बाब क्र.११ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जीएन' ब्लॉकमध्ये ११० केव्ही क्षमतेचे संकल्पित विद्युत उपस्थानक उभारण्यासाठी टाटा हायड्रो-इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीला जमिनीचे नियत वाटप

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२४६ :

"असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, उपरोक्त प्रकरणी असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा कलम ३ चे पोटकलम २ अन्वये असलेल्या प्रदत्त शक्तिंचा आणि त्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या अन्य सर्व शक्तिंचा वापर करुन हे प्राधिकरण वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जीएन' ब्लॉकमधील भू खंडाचा अधिमूल्य दर प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मी.ला रु.२८००/- इतका या ठरावान्वये निश्चित करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, वांद्रे-कुर्ला समूह आणि भोवतालच्या भागातील वीज पुरवठयाची गरज पुरी करता यावी यासाठी श्री टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी लि. या वीज कंपनीस ११० केव्ही क्षमतेचे वीज केंद्र उभारण्यासाठी वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जीएन' ब्लॉकमधील ५०००/-चौ.मी.

३२३

क्षेत्राचा भू खंड मुं.म.प्र.वि.प्रा.(जमिन विक्री) विनियम १९७७ मधील निर्दिष्ट नियम व अटी बरहुकूम नियत वाटपाने देण्यात यावा.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वरील प्रकरणी देकार करण्यासाठी आणि आवश्यक वाटणा-या सर्व संबंध्द फेरफारासह भाडेपट्टीच्या करारनाम्याशी संबंधित आवश्यक ते सर्व दस्तऐवज आणि भाडेपट्टा विलेख यांचे निष्पादन करण्यासाठी या ठरावाव्दारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर अध्यक्ष महोदयांच्या अनुमतीने पुढील बाबींवर पटल-बाब म्हणून विचारविमर्श करण्याचे ठरले :

पटल बाब : प्रकल्प अधिकारी (बाजारपेठा) हे पद पुढे चालू ठेवण्याबाबत

पटल बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२४७ :

"असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, प्रकल्प अधिकारी (बाजारपेठा) हे पद पुढे आणखी एक वर्ष म्हणजे दिनांक 31 मार्च १९८५ पर्यन्त चालू ठेवण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे."

सभाध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

---

एचः १७२८४.

# MINUTES OF THE THIRTY-SECOND MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

**DATE** : 9th February 1984 (Thursday)

**TIME** : 11.00 A.M.

**PLACE** : The Deputy Chief Minister's Committee Room (6th Floor), Mantralaya.

**MEMBERS PRESENT** :

| | | |
|---|---|---|
| 1) Shri Ramrao W. Adik, Deputy Chief Minister and Minister for Urban Development. | - | Chairman |
| 2) Shri Chandrakant Tripathi, Minister of State for Urban Development. | - | Member |
| 3) Shri Manmohansingh H. Bedi, Mayor of Bombay. | - | Member |
| 4) Dr. Saurabh R. Majmundar, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - | Member |
| 5) Shri N.R. Ranganathan, Secretary to the Government of Maharashtra, Urban Development Department. | - | Member |
| 6) Shri L.C. Gupta, Managing Director, CIDCO. | - | Member |
| 7) Shri A.N. Batabyal, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | - | Member-Secretary. |

**Item No.1** : Confirmation of the minutes of the last (31st) Meeting.

The minutes were confirmed.

**Item No.2** : Action taken on the minutes of the last (31st) Meeting.

Action taken statement was noted by the Authority. Metropolitan Commissioner nonetheless drew the attention of the members to Item 5 of the said statement and stated that notwithstanding the write-up on the item, the Chairman has desired that the two offers which have been received may be presented before the Authority, so as to enable the members to express their views on the two designs which have been received. The members of the Authority approved the design of M/s. Promenade Park but directed that actual development should only be undertaken after Government in Revenue and Forests Department hands over possession of this land to BMRDA. The Authority further directed the Metropolitan Commissioner to approach Revenue and Forests Department

through Urban Development Department that as the land is being used for development of a garden, a nominal price should be charged to the Authority for the same.

Item No.3 : Annual Works Programme for the year 1984-85.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.240 :

"RESOLVED THAT (a) the Annual Works Programme for the year 1984-85 presented with the item note is approved and (b) the Executive Committee is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme."

Item No.4 : Annual Budget Estimates for the year 1984-85.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.241 :

"RESOLVED THAT the Annual Budget Estimates in respect of the financial year 1984-85 and the Revised Estimates for 1983-84 showing estimated receipts and disbursements of the Metropolitan Authority, are approved under section 23(1) of the BMRDA Act, 1974.

"RESOLVED FURTHER THAT the Authority do hereby delegate the power to the Executive Committee to sanction schemes, surveys, etc., not included in the works Programme, estimated to cost not more than Rs.10/- lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit, in respect of which provision has not been made in the approved budget, subject to a report of such cases being made to the Authority at the next meeting."

Item No. 5 : Allotment of land at Panchpakhadi Tahsil Thane to the BMRDA Employees' Co-Operative Housing Society.

After some discussion, the Authority approved the proposal in principle but directed that before actual allotment is made, they would like to approve the price that would be charged and the basis on which the said price was arrived at. The Authority also wanted to know the provisions of the BMRDA (Disposal of Land) Regulations in this respect.

Item No.6 :.....

Item No.6 : Disposal and determination of premium of commercial plots No.C-23 to C-25 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

The Authority considered the item note and agreed that Rs.2,800/- per F.S.I. square metre was a reasonable price but did not agree that on the basis of this off-set price, offers be invited from Government organisations or semi-Governme t organisations.

The item note did not make any specific recommendation about the parties to which these plots would be offered; although a statement showing the land requirements from various organisations on the records of the Authority was placed on the Table. The Authority agreed with the criterion mentioned at para.6 of the item note and said that in the next meeting of the Authority, a proposal might be brought as to which of the organisations among those who have asked for land fulfil this criterion, the plots under reference would be allotted.

Item No.7 : Draft Structure Plan for the Kalyan Complex Notified Area.(Postponed Item).

The Authority considered the Item and passed the following Resolution :

RESOLUTION NO.242 :

"RESOLVED THAT the Authority hereby approves the draft Structure Plan (1981-2001) for the Kalyan Complex Notified Area

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner is authorised to communicate to Government the recommendations of this Authority for publication of the Plan by Government in exercise of its powers under sub-Section(2) of Section 20 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, for inviting suggestions and objections from public and to take further actions as necessary to accord its final approval."

Item No.8 : Preparation of Development Plan for Dombivli - Declaration of intention -

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.243 :

"Whereas Government of Maharashtra under Government Notification No.TPB/1275/1199 UD-5, dated 15th March,1976, under the provision of sub-section 1(c) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act,1966,

appointed.....

appointed Bombay Metropolitan Region Development Authority established under the BMRDA Act, 1974 to be the Special Planning Authority for Kalyan Complex notified area;

And whereas Government in Urban Development Department, vide Government Notification No.TPS/1278/6511-UD-5, dated 14th March,1983, considered it expedient for the exclusion of some area from the area already notified as Kalyan Complex referred to above and altered the boundary of the notified area to that effect due to the constitution of Municipal Corporation for the City of Thane;

And whereas the BMRDA considers it necessary to prepare the development plan for the whole area of the Special Planning Authority under Section 113(8) of the M.R.T.P. Act, Chapter VI being applicable in respect of the Special Planning Authority - vide Section 40 - Sub-section (3) of the Act;

Ane whereas the BMRDA considers it expedient that an interim development plan is prepared for part of the area - namely Dombivli and its surroundings, pending the preparation of the draft development plan for the whole area, under Section 32 of the M.R.T.P. Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by the M.R.T.P. Act, 1966, the BMRDA HEREBY RESOLVE -

i) to declare intention to prepare the development plan for the whole area within its jurisdiction as a Special Planning Authority under section 23 of the M.R.T.P. Act;

ii) to prepare an interim development plan for part of the area - namely Dombivli and its surroundings, pending the preparation of the draft development plan for the whole area within its jurisdiction, under Section 32 of the M.R.T.P. Act.

A plan annexed to this Resolution showing the boundaries of the entire area for which development plan is to be prepared and also the boundaries of the part - namely Dombivli and its surroundings, for which interim

development.....

development plan is to be prepared should be kept open for the inspection of the public.

The Metropolitan Commissioner be and is hereby authorised to publish the Notice of declaration of intention to prepare Development Plan as required under the M.R.T.P. Act and its Rules.

The Metropolitan Commissioner is also authorised to sanction the posts as may be necessary for the work of preparation of development plan."

Item No.9 : Draft Regional Plan for the extended B.M.R. (Pen-Alibag) - Appointment of the Regional Planning Committee.

In view of the observations made in the Item Note, the Authority agreed to partially modify its Resolution No.213 adopted at its 27th meeting held on 4th March, 1983 so as to change the constitution of the Planning Committee and adopted the following Resolution :

RESOLUTION NO.244 :

"RESOLVED THAT para 3 of Authority's Resolution No.213, dated 4th March 1983 be substituted so as to read as follows :-

'RESOLVED FURTHER THAT the Authority appoints the Regional Planning Committee consisting of -

(i) The Managing Director, CIDCO;
(ii) The Metropolitan Commissioner, BMRDA; and
(iii) The Chief, Town and Country Planning Division, BMRDA (as Town Planning Officer under Section 10(3) of the said Act).'"

Item No.10 : Annual Reports of the BMRDA as a Special Planning Authority for (a) Kalyan Complex Notified Area and (b) Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1982-83.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.245 :

"RESOLVED THAT the Authority hereby approves the Draft Annual Reports for the year 1982-83 of the BMRDA as a Special Planning Authority for (a) Kalyan Complex

Notified........

Notified Area and (b) Bandra-Kurla Complex Notified Area, as required under Section 133 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to submit the Reports mentioned in para.1 above to the State Government."

Item No.11 : Allotment of land in the 'GN' Block of Bandra-Kurla Complex to Tata Hydro-Electric Power Supply Co.Ltd. for proposed 110 KV Sub-Station.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.246 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred in this behalf, the Authority hereby determines the premium of plot of land from 'Gn' Block of the Bandra-Kurla Complex @ Rs.2,800/- per F.S.I. square metre.

"RESOLVED FURTHER THAT a plot of land admeasuring 5,000 square metres be allotted to the Tata Hydro Electric Power Supply Co.Ltd. in the 'Gn' Block of Bandra-Kurla Complex for establishment of its 110 KV Station to enable it to cater to the electrical supply needs of the Bandra-Kurla Complex and adjoining areas, on the terms and conditions enumerated in the BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to take further necessary action for making offers and for executing necessary documents of agreement to lease and lease deed with suitable modifications as deemed necessary."

The following item was then considered as Table Item, with the approval of the Chairman :

Table Item : Continuance of the post of Project Officer(Marketing).

The Authority considered the Item Note, and passed the following Resolution :

RESOLUTION NO.247 :

"RESOLVED THAT THE Authority hereby approves continuance of the post of Project Officer(Marketing) for a further period of one year ending on 31st March,1985."

The Meeting then concluded after a vote of thanks to the Chair.

££££££££££
££££££

840217: